# प्रेस नोट

पोलीस बिनतारी संदेश विभागाच्या एकुण 125 तांत्रिक हेड कॉन्स्टेबल पदाच्या प्रशिक्षणार्थींचा दिक्षांत संचलन सोहळा दि. 29/11/17 रोजी बिनतारी संदेश विभागाच्या चव्हाणनगर पुणे मुख्यालयात पार पडला.तीन महिन्यांच्या तांत्रिक व शारीरिक प्रशिक्षणानंतर सदरचे प्रशिक्षणार्थी बिनतारी विभागात रूजु होणार आहेत. तुरूंग विभागाचे अपर पो.महासंचालक डॉ.भुषणकुमार उपाध्याय हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते.प्रशिक्षणार्थी यांचे वतीने त्यांना शानदार मानवंदना देण्यात आली.

कार्यक्रमाचे अन्य उपस्थितांमध्ये बिनतारी संदेश विभागाचे अपर पोलीस महासंचालक व संचालक श्री.रितेश कुमार , पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश श्री.पी.टी.सोनवणे व बिनतारी संदेश विभागाचे अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात श्री.एस.के.चक्रनारायण पो.उप-अधिक्षक बिनतारी संदेश प्रशिक्षण केंद्र यांनी प्रशिक्षणार्थी यांचे दैनंदिन प्रशिक्षण व भविष्यातील प्रशिक्षण सत्रांची माहिती दिली.

अध्यक्षस्थानी बोलताना श्री.उपाध्याय यांनी दळवळणाचे अनेकविध पैलू उलगडताना दैनंदिन,पारमार्थिक व तांत्रिक उदाहरणे देउन त्याचे महत्व उपस्थितांना विषद केले.सदैव मदतीस तत्पर राहण्याबरोबरच उत्तम व शिस्तबध्द पोलीस होण्याचे त्यांनी प्रशिक्षणार्थी यांना आव्हान करताना त्यांच्या गणवेष व उत्तम परेडचे कौतुक केले.श्री.रितेष कुमार यांनी प्रशिक्षणार्थी यांच्या परिश्रमांचे कौतुक करताना भविष्यात कर्तव्या दरम्यान येणा-या आव्हांनाचा मुकाबला करण्यासाठी नविन तंत्रज्ञान आत्मसात करून कठोर परिश्रमासाठी सज्ज राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.त्यांनी भविष्यातील वाटचालीसाठी सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या.

गुणवंत प्रशिक्षणार्थींचा अध्यक्षांचे हस्ते बक्षिसे देउन गौरव करण्यात आला.बिनतारी पोलीस अधिक्षक श्री.सोनवणे यांनी उपस्थितांचे आभार मानले, व सर्व संबंधितांनी कार्यक्रम यशस्वी केल्याबददल त्यांना धन्यवाद दिले.